ePaper
महाराष्ट्रात पहिल्यांदाच होणार फॉर्म्यूला नाईट स्ट्रिट रेस, डिसेंबरमध्ये रंगणार थरार!
वर्ष - 9 । अंक -30 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- कधी रंगणार IND VS PAK सामना?
- मान्धनाचा झंझावात; ५० चेंडूत शतक
- भारत-अमेरिका व्यापार करार मार्गी?
- मोदी भारताचे पंतप्रधान कमकुवत आहेत


www.mahaenews.com । रविवार, दि. 21 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून महायुतीतील दोन पक्षांमध्ये जोरदार रस्सीखेच

# अजितदादा भाजपची डोकेदुखी वाढवणार?

## बालेकिल्ला वाचवण्यासाठी धडपड, पिंपरी-चिंचवडमध्ये 'मिलन'

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. ही मुदतवाढ एक संधी समजून राज्यातील सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या जोरदार तयारीला लागले आहेत. राज्यात एकमेकांचे मित्र पक्ष असणारे भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये पुण्यात खरी चुरस पाहायला मिळणार आहे. कधीकाळी पुणे आणि पिंपरी चिंचवड हा एकसंध राष्ट्रवादीचा बालेकिल्ला समजला जायचा. मात्र 2017 साली झालेल्या महापालिका निवडणुकांत दोन्ही महापालिकेवर भाजपने आपला झेंडा फडकवला होता. आता राज्यात जरी मित्र असले तरी भाजपच्या हातातून आपला बालेकिल्ला परत मिळवण्यासाठी राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धडपड सुरू केली आहे..**



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून 'जनसंवाद' आणि 'राष्ट्रवादी परिवार मिलन' या दोन कार्यक्रमाची बांधणी केली आहे. यात जनसंवाद कार्यक्रमास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे स्वतः उपस्थित राहून अधिकाऱ्यांच्या समक्ष थेट नागरिकांना भेटून त्यांच्या प्रश्नांवर उत्तर शोधत आहेत. तर राष्ट्रवादी परिवार मिलन या कार्यक्रमामध्ये अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या थेट घरी आणि कार्यालयांना भेट देऊन संघटना मजबूत करण्याचं काम करत आहेत. पुण्यातील हडपसर विधानसभा मतदारसंघातून या दोन्ही कार्यक्रमाला अजित पवारांनी सुरुवात केली आहे. आज हे दोन्ही कार्यक्रम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत होत आहेत.

अजित पवार यांनी आज सकाळपासूनच जनसंवाद कार्यक्रमाला सुरुवात केली असून आज रात्रीपर्यंत जनसंवाद आणि राष्ट्रवादी परिवार मिलन हे दोन्ही कार्यक्रम पिंपरी चिंचवड शहरात होणार आहेत. गेल्या आठवड्यात भारतीय जनता पक्षाचे पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी भाजपकडून 32 प्रभागांत 128 उमेदवार रिंगणात उतरवले जाणार असून भाजप संघटनात्मक ताकदीच्या जोरावर स्वबळावर लढण्यासाठी सज्ज असल्याची माहिती दिली होती.

दुसरीकडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर सलग 15 वर्षे सत्तेत असणाऱ्या राष्ट्रवादीला 2017 मध्ये 128 पैकी फक्त 36 नगरसेवकांवर समाधान मानाव लागलं होतं. तर भारतीय जनता पक्षाने 77 जागा जिंकत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर आपला झेंडा फडकवला होता. आत्ता पिंपरी-चिंचवड शहरामध्ये भोसरीत महेश लांडगे, चिंचवडमध्ये शंकर जगताप हे दोन विधानसभेचे आमदार तर विधान परिषदेवर अमित गोरखे आणि उमा खापरे हे दोन असे एकूण चार आमदार लाभले आहेत. या चारही आमदारांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर पुन्हा एकदा भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी कंबर कसली आहे. तर याउलट राष्ट्रवादीचे पिंपरी विधानसभा मतदारसंघात अण्णा बनसोडे हे एकच आमदार आहेत. त्यामुळे कधीकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असणाऱ्या पिंपरी चिंचवड शहरात तुलनेने भाजपची ताकद जास्त आहे.

दरम्यान, यामुळेच आता स्वतः अजित पवार हे पिंपरी चिंचवडमध्ये फिल्डवर उतरले असून राष्ट्रवादीच्या फुटीनंतर कमी झालेल्या ताकदीत भर घालण्याचा प्रयत्न करत आहेत. एकीकडे भाजपने संघटनात्मक वाढीवर जोर दिला असताना दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसकडून अद्याप कार्यकारणी देखील जाहीर झालेली नाही. अशातच स्वतः अजित पवार ग्राउंडवर उतरल्यानंतर भाजपचा होल्ड असणाऱ्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये आपल्या पक्षाला नवसंजीवनी देऊ शकणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

### कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न

#### अजित पवारांची रणनीती

- जनसंवाद कार्यक्रम : नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे शोधणे.
- राष्ट्रवादी परिवार मिलन : कार्यकर्त्यांच्या घरी व कार्यालयांना भेटी देऊन संघटना बळकट करणे.
- हडपसर विधानसभा मतदारसंघातून सुरुवात; आज पिंपरी-चिंचवडमध्ये कार्यक्रम.

#### भाजपची तयारी

पिंपरी-चिंचवड भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची घोषणा
३२ प्रभागांत १२८ उमेदवार उतरवणार.
स्वबळावर लढण्याची तयारी.
शहरात भाजपचे ४ आमदार (महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, उमा खापरे).
२०१७ मध्ये भाजपने ७७ जागा जिंकल्या, राष्ट्रवादीकडे फक्त ३६.

समाजवादी संमेलन ‘काँग्रेस’च्या प्रदेशाध्यक्षांची ‘भाजप’वर खरमरीत टीका...

# समृद्धीत 20 हजार कोटींचा भ्रष्टाचार!

## ‘निवडणूक जिंकण्यासाठी भ्रष्टाचार’



।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**‘सध्या राज्यांची विकासनीती संविधानातील तत्त्वांच्या आधारे ठरवली जात नाही. आर्थिक असमानता नष्ट करण्याची राजकीय इच्छाशक्तीही दिसत नाही. मात्र, काही अब्जाधीशांनाच ठरवून मोठे केले जात आहे,’ अशी टीका ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी केली.**

समाजवादी चळवळीच्या ९० वर्षपूर्तीनिमित्त आयोजित ‘समाजवादी संमेलना’त ‘विकासाच्या संकल्पनेपुढील आव्हाने आणि समाजवादी पर्याय’ या विषयावरील सत्रात पाटकर बोलत होत्या. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, अर्थतज्ज्ञ हितेश पोतदार, पर्यावरणतज्ज्ञ सौम्य दत्त, किसान संघर्ष समितीच्या प्रदेशाध्यक्ष ॲड. आराधना भार्गव चर्चासत्रात सहभागी झाले होते. लोकशक्ती अभियानचे संयोजक प्रफुल्ल सामंतरा यांनी सत्राचे सूत्रसंचालन केले.पाटकर म्हणाल्या,‘आजच्या काळात विकास हा मंत्र झाला आहे. मात्र, आर्थिक असमानता यालाच विकास म्हटले जात आहे. मणिपूरमधील हिंसाचार केवळ दोन समाजांतील नाही. त्याच्या मुळाशी हा विकास आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक साधनसंपत्तीची नासधूस केली जात आहे.’‘देशात गरीब आणखी गरीब आणि श्रीमंत आणखी श्रीमंत होत आहेत. गरिबी आणि श्रीमंती हा मोठा भेद आहे. मात्र, देशाचे पंतप्रधान सांगतात, की श्रीमंत होणे हे पाप नाही. देशातील, राज्यातील अनेक जागा काही उद्योजकांच्या घशात घातल्या जात आहेत,’ असा टोला सपकाळ यांनी लगावला. ‘काँग्रेस आणि समाजवादी चळवळ यांचे पूर्वापार संबंध आहेत. मात्र, समाजवाद्यांचे आणि काँग्रेसचे संबंध हे ‘तुझे माझे जमेना, तुझ्यावाचून करमेना’ असेच राहिले आहेत,’ अशी मिश्किल टिप्पणीही त्यांनी केली. माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ‘सामाजिक न्याय – जनआंदोलन आणि व्यवस्था परिवर्तन’ या विषयावर दुसरे सत्र झाले. त्यात मधू मोहिते, निरंजन टकले, सुशीला मोराळे, रत्ना व्होरा यांनी सहभाग नोंदवला.

‘सरकार कुणाचेही असो, सत्ता मात्र आमच्याच हाती असली पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची ही रणनीती आहे,’ अशी टीका कोळसे पाटील यांनी केली, तर ‘शाळेच्या अभ्यासक्रमातून

### काँग्रेस पक्षाची भूमिका स्पष्ट

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या वार्तालापाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले यावेळी उपस्थित होते. पत्रकारसंघात झालेल्या या वार्तालापाच्या कार्यक्रमात सपकाळ यांनी विविध राजकीय विषयांवर भाष्य करत आगामी निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाची भूमिका स्पष्ट केली. तसेच पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली.

खोटा आणि विखारी इतिहास शिकवला जात असून, त्याविरोधात प्रतिकार करायला हवा,’ असे टकले म्हणाले.‘समृद्धी महामार्ग उभारणीत २० हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला. त्यातून मिळालेल्या पैशांचा वापर राज्यातील पक्ष फोडण्यासाठी, विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी करण्यात आला,’ अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला यंदाच्या वर्षी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यंदा २ ऑक्टोबरला गांधी जयंती आणि आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन असून याच दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वर्धापनदिन आहे. हा संकेत राष्ट्रीय स्वयंसेवी संघाने समजून घ्यावा. १०० वर्धापनदिनाच्या दिवशी त्यांनी मनुस्मृतीचे दहन करुन संविधान आपल्याकडे ठेवावे, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. काँग्रेस पक्षाची विचारधारा करुणा, समतेच्या विचारांना धरून चालते. तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आदर्श हा हिटलर आहे, समता नाकारणारी मनुस्मृती त्यांना महत्वाची वाटते, अशा टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी केली. येत्या २ ऑक्टोबरला युवक काँग्रेसचे पदाधिकारी नागपूर येथे रेशीमबागेत जाऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वर्धापनदिनानिमित्त भारता नागपूरच्यागांधीजींच्या सेवाग्राम आश्रमापर्यंत ‘ चला गांधींकडे’ आदी मोहीम काँग्रेसकडून राबवली

# संगीत माझ्यासाठी श्वास आणि साधनाही

## प्रसिद्ध तबलावादक पं. रामदास पळसुले यांची भावना



।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**संगीत ही माझ्यासाठी फक्त कला नाही; तर श्वास आणि साधनादेखील आहे,’ अशी भावना प्रसिद्ध तबलावादक पं. रामदास पळसुले यांनी शनिवारी व्यक्त केली. ‘संगीताचा हा अनमोल वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा अथक प्रयत्न करत राहीन,’ अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली.**

गानवर्धन आणि तात्यासाहेब नातू फाउंडेशन यांच्या वतीने ज्येष्ठ गायक पं. अजय पोहनकर आणि प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांच्या हस्ते रामदास पळसुले यांना स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे शास्त्रीय संगीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्या प्रसंगी पळसुले बोलत होते. तात्यासाहेब नातू फाउंडेशनचे अध्यक्ष शारंग नातू, गानवर्धनचे अध्यक्ष डॉ. दयानंद घोटकर, सचिव डॉ. वासंती ब्रह्मे आदी या वेळी उपस्थित होते.पळसुले म्हणाले, ‘डॉ. प्रभा अत्रे या शास्त्रशुद्धता, साधना आणि नवनिर्मितीचा संगम असलेल्या महान कलाकार होत्या. त्या संशोधक, लेखिका आणि प्रभावी गुरू होत्या. भारतीय

### शास्त्रीय संगीताचा वारसा

डॉ. दयानंद घोटकर, सचिव डॉ. वासंती ब्रह्मे आदी या वेळी उपस्थित होते.पळसुले म्हणाले, ‘डॉ. प्रभा अत्रे या शास्त्रशुद्धता, साधना आणि नवनिर्मितीचा संगम असलेल्या महान कलाकार होत्या. त्या संशोधक, लेखिका आणि प्रभावी गुरू होत्या. भारतीय शास्त्रीय संगीताचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी अखंडितपणे कार्य केले.

शास्त्रीय संगीताचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी अखंडितपणे कार्य केले. त्यांच्या गायनातील ऊर्जा आजही रसिकांना आनंद आणि प्रेरणा देत आहे.’पोहनकर म्हणाले, ‘डॉ. प्रभा अत्रे आणि माझा पन्नास वर्षांहून अधिक काळाचा अनुबंध होता. तालयोगी पं. सुरेश तळवलकर यांनी आपल्या प्रत्येक शिष्यावर पुत्रवत प्रेम करून त्यांना संस्कारित केले आहे.गानवर्धन आणि तात्यासाहेब नातू फाउंडेशन यांच्या वतीने अच्युत गोडबोले यांच्या हस्ते रामदास पळसुले यांना स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे शास्त्रीय संगीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जनसंवाद उपक्रम

## पिंपरी-चिंचवडमधील गुंडगिरीचा बिमोड करण्याचीही सूचना


# पाणी, कचरा प्रश्नावर ठोस उपाय योजना!

### अजित पवार : पिंपरी चिंचवड मधील नागरिकांच्या समस्यांचा पालकमंत्र्यांकडून आढावा

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरामध्ये पाणी आणि कचरा समस्या जास्त आहेत. त्याच बाबत जास्त तक्रारी आहेत. त्याबाबत महापालिका आयुक्तांना मी बोललो आहे. त्यावर लवकरच तोडगा काढतील, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. दरम्यान पिंपरी-चिंचवडमधील गुंडगिरीचा बिमोड करा. महिलांना सन्मानाची वागणूक मिळण्याची खबरदारी घ्या, अशी ताकीदही पवार यांनी पोलिस प्रशासनाला**

**लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार हे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने मतदारांशी संवाद साधत आहेत.**



त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून 'जनसंवाद' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यातून नागरिकांच्या तक्रारींचे जागेवर निवारण करण्यात येत आहे. पिंपरीत 'जनसंवादा'ला नागरिकांनी गर्दी केली होती. आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे, समाजकल्याणच्या आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी शहरातील विविध भागांतील नागरिकांनी प्रश्न मांडले. त्यामध्ये कचरा, रस्ता, पाणी, डीपीच्या सुचनांचाही समावेश होता.

दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवारांची जनसंवाद सभा सकाळी ९ च्या दरम्यान सुरु झाली होती. नागरिकांच्या समस्या अजित पवार ऐकून घेत त्यावर संबंधित अधिकाऱ्यांना सुचना करत होते. दुपारी दीडच्या दरम्यान अजित पवार पुढील कार्यक्रमांना जायला निघाले. त्यावेळी उपस्थित नागरिकांनी अजित पवारांना 'दादा, आमच्याही समस्या ऐकून घ्या, असे म्हणत स्टेजकडे धाव घेतली. त्यावेळी अजित पवारांनी सर्वांनी समस्याचे निवेदन माझ्या माणसांकडे द्या. सगळ्यांचे प्रश्न सोडवतो, असे म्हणत सर्वांचे तक्रारींची निवेदने देण्यास सांगितले.

### पाणीपुरवठ्याच्या सर्वाधिक तक्रारी

यंदा पाऊस चांगला झाला आहे. धरणे शंभर टक्के भरली आहेत. तरीही शहरात स्वच्छ आणि मुबलक पाणी मिळत नाही. पाणीपुरवठा विस्कळीत असतो. रोज पुरेसे पाणी मिळत नाही. रस्त्यांची अवस्था चांगली नाही. कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली जात नाही, या स्वरुपाच्या तक्रारी सर्वाधिक होत्या, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. नगरविकास, कामगार, सामाजिक यांसह विविध विभागांशी संबंधित प्रश्न नागरिकांनी मांडले. त्यातील काही प्रश्न तत्काळ फोन लावून मार्गी लावण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### पोलिसांना सक्त ताकीद

देशातील लाडक्या बहिणी तसेच महिलांना महिलांना मानसन्मान मिळाला पाहिजे. त्यांची फसवणूक, अडवणूक होता कामा नये. सुरक्षा अबाधित राहिली पाहिजे. त्यामुळे शहरात कोणाचीही गुंडगिरी, दादागिरी, दहशत अजिबात चालू देऊ नका. या प्रवृत्तींचा वेळीच बिमोड करावा, अशा सूचना पोलिसांना दिल्या आहेत.

# सफाई कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवा

### अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक; कल्याणकारी योजनांचा घेतला

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध असून या घटकांचे सर्वांगीण कल्याण करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून जाणिवपूर्वक प्रयत्न करावेत, असे निर्देश महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीचे प्रमुख नारायण कुचे यांनी दिले. सफाई कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न त्यांच्या मागण्या आणि अडचणी प्राधान्यांनी सोडवा असेही या बैठकीत निर्देश देण्यात आले.**



महाराष्ट्र विधानमंडळाची अनुसूचित जाती कल्याण समिती पुणे जिल्हा दौऱ्यावर आहे. आज या समितीची पिंपरी चिंचवड महापालिकेत बैठक पार पडली. यावेळी आमदार अमित गोरखे,भीमराव केराम, तानाजी मुटकुळे, शाम खोंडे, सचिन पाटील, गजानन लवटे, संजय मेश्राम, डॉ. प्रज्ञा सातव, जगन्नाथ अभ्यंकर यांच्यासह विधानमंडळ सचिवालयाचे सहसचिव सुभाष नलावडे, अवर सचिव सीमा तांबे, कक्ष अधिकारी राहुल लिंगरवार, समिती प्रमुख यांचे स्वीय सहाय्यक रणजित गमरे, सहाय्यक कक्ष अधिकारी संदीप माने, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील उपस्थित होते.या बैठकीत महापालिकेतील अनुसूचित जातींच्या प्रवर्गातील कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांबाबत समिती सदस्यांनी माहिती घेऊन त्यांनी अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.

अनुसूचित जाती कल्याण समितीचे प्रमुख नारायण कुचे म्हणाले, प्रशासनातील सर्व योजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करून अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी असलेल्या योजना आणि प्रशासकीय लाभ सर्व घटकांपर्यंत पोहोचतील यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे. महापालिकेच्या स्तरावर अनुसूचित जातींसाठी विविध योजना आखण्यात येतात. त्यासाठी स्वतंत्र निधीची देखील तरतूद केली जात असते. हा निधी केवळ अनुसूचित जातीसाठी असलेल्या संबंधित योजनेसाठी वापरावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

अनुसूचित जाती कल्याण समितीचे प्रमुख कुचे म्हणाले, सफाई कर्मचारी यांच्याबाबत निर्णय घेताना माणुसकीच्या भावनेतून विचार करण्याची गरज आहे.

या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्यात यावीत. त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. सफाई कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्क देण्यात यावेत. सफाई कर्मचाऱ्यांचे प्रलंबित असणारे प्रश्न तातडीने सोडवावेत, असेही ते म्हणाले.

# शिक्षण आमच्या हक्काचं!



## भूमिका

**१९९१ साली मोहिनी जैन या विद्यार्थिनीची वैद्यकीय शिक्षणाकरिता कर्नाटकमधील सिद्धार्थ मेडिकल कॉलेजमध्ये निवड झाली. त्यासाठीची वार्षिक फी होती ६० हजार रुपये. याशिवाय साडेचार लाख रुपये डोनेशन मागण्यात आले.**

सरकारी जागांच्या कोट्यातून मोहिनी जैन यांची निवड झाली होती, मात्र कर्नाटक सरकारने शिक्षणसंस्थांना शुल्क ठरवण्याचे स्वातंत्र्य देणारी अधिसूचना १९८९ साली जारी केली होती. त्यात मोहिनी जैन ही विद्यार्थिनी उत्तर प्रदेशची आणि या अधिसूचनेने परराज्यातील विद्यार्थ्यांकरिता अधिक फी ठरवली होती. मोहिनीची आर्थिक परिस्थिती बेताची होती. तिला इतके पैसे भरून शिक्षण घेणे अशक्य होते. त्यामुळे या संदर्भात ती न्यायालयात गेली. शिक्षण हा आपला मूलभूत हक्क आहे, असा तिचा युक्तिवाद होता. न्यायालयाने बाजू ऐकून घेतली आणि सांगितले की, शिक्षण हा काही व्यापार नाही. तो कर्तव्याचा आणि सेवेचा भाग आहे. तसेच आत्यंतिक खासगीकरणामुळे शिक्षण घेणेच अशक्य होईल, याचा विचार करून या शुल्कावर नियंत्रण आणण्याचे निर्देश दिले. मूलभूत शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे. एकविसाव्या अनुच्छेदामध्ये जगण्याच्या अधिकारामध्ये तो अंतर्भूत आहे, असे सांगणारा न्यायालयाचा निर्णय खूप मोलाचा होता. उन्नीकृष्णन खटल्यात



(१९९३) सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाचा हा मूलभूत हक्क प्रत्येक व्यक्तीला असल्याचे सांगितले; मात्र उच्च शिक्षण/ व्यावसायिक शिक्षण हा मूलभूत अधिकाराचा भाग नाही, असे सांगितले. त्यामुळे वयाच्या १४ व्या वर्षापर्यंतचे शिक्षण हा मूलभूत हक्क असल्याचे या निर्णयाने अधोरेखित झाले. त्यानंतर २००२ साली ८६ वी घटनादुरुस्ती करून अनुच्छेद २१ मध्ये शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मान्य केले गेले. या दुरुस्तीनुसार वय ६ ते १४ वर्षे या वयोगटातील प्राथमिक शिक्षण हा मूलभूत हक्क मान्य केला आणि अनुच्छेद २१ (क) मध्ये शिक्षण हक्क सामाविष्ट केला गेला. नंतर २००९ साली भारत सरकारने शिक्षण हक्क कायदा संमत केला आणि त्यानुसार सर्वांपर्यंत शिक्षण पोहोचण्याची दारे किलकिली झाली.मुळात ही घटनादुरुस्ती आणि नंतर कायदा झाला असला तरी त्यासाठीची तरतूद राज्यसंस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये होती. त्यानुसार घटनादुरुस्ती झाली. मात्र यासाठीचा लढा सुरू झाला एकोणिसाव्या शतकात. सावित्रीबाई आणि जोतिबा फुले यांनी शाळा सुरू केल्या. त्यासोबतच सर्वांना शिक्षण मिळावं यासाठीचा आग्रह धरला. १८८२ मध्येच हंटर आयोगासमोर सर्वांना मोफत, समान व सक्तीचे शिक्षण मिळावे यासाठी महात्मा फुलेंनी मागणी केली. ब्रिटिशांनी महात्मा फुलेंना न्याय दिला नसला तरी सयाजीराव गायकवाड आणि राजर्षि शाहू महाराजांनी आपापल्या संस्थानांमध्ये शिक्षण हक्काची अंमलबजावणी केली. काँग्रेसने नेहरू अहवालात, कराची ठरावामध्ये या हक्कासाठीची आग्रही मागणी केली. संविधानसभेतही याबाबत चर्चा झाली. तेव्हा राज्यसंस्थेसाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्याचा समावेश केला गेला. स्वातंत्र्यानंतर शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला खरा; पण अधिकृतपणे शिक्षण हक्क मान्य व्हायला खूप उशीर झाला.जगण्याच्या हक्कामध्येच शिक्षणाचा हक्क अंतर्निहित आहे, असे न्यायालय म्हणते तेव्हा त्याचा नेमका अर्थ समजून घेतला पाहिजे. जगण्याला शिक्षणापासून वेगळे करता येत नाही. महात्मा फुले म्हणाले होते: ‘सारे अनर्थ अविद्येने झाले आहेत आणि समाजातले परिवर्तन शिक्षणामार्फतच होऊ शकते.’ अर्थातच अंधारातून प्रकाशाकडे जायची वाट शिक्षणातून मिळते. हे शिक्षण कोणत्याही सबबीखाली नाकारता येणार नाही. ते आमच्या हक्काचे आहे. संविधानाने शाळेचे प्रवेशद्वार सर्वांसाठी खुले केले. हजारो वर्षांची नाकेबंदी संपली आणि गावकुसाबाहेरच्या वस्तीतली इवलीशी लेक पाटीवर ‘ग म भ न’ गिरवू लागली. सरकारी जागांच्या कोट्यातून मोहिनी जैन यांची निवड झाली होती, मात्र कर्नाटक सरकारने शिक्षणसंस्थांना शुल्क ठरवण्याचे स्वातंत्र्य देणारी अधिसूचना १९८९ साली जारी केली होती. त्यात मोहिनी जैन ही विद्यार्थिनी उत्तर प्रदेशची आणि या अधिसूचनेने परराज्यातील विद्यार्थ्यांकरिता अधिक फी ठरवली होती.

## संपादकीय »

### नावडणुकांचा नगारा!

***राज्यातील पालिका व जि. प. निवडणुका ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर इतकी वर्षे रखडल्या, त्या हा मुद्दा सुटला नसला तरी अखेर होणार, हे ठीक...***


अधिकाराचे विकेंद्रीकरण हे लोकशाहीतील मूलभूत तत्त्व. तथापि आम्ही किती खरे लोकशाहीवादी याचा वारंवार पुनरुच्चार करणारे या तत्त्वाला पायदळी तुडवत असतात याची उदाहरणे अनेक. अलीकडे त्यात वाढच दिसते. याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला. निमित्त ठरले राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे. यावरून सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाला खडे बोल सुनावले. आता या निवडणुका येत्या ३१ जानेवारीपर्यंत घ्याव्या लागणार. त्यात पुन्हा मुदतवाढ मागितली जाऊ नये म्हणून न्यायालयाने मनुष्यबळ, ईव्हीएम आदी मुद्द्यांबाबत न्यायालयाकडे अर्ज करण्यासाठी दीड महिन्याची मुदतही ठरवून दिली. हे बरे झाले. त्यामुळे आयोगाला आता दिलेल्या मुदतीत निवडणुका घेण्यावाचून दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहिलेला नाही.

महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेला आज एका अनपेक्षित संकटाने वेठीस धरले आहे, कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक असलेल्या ऐतिहासिक नोंदी शोधण्याचे काम राज्यभर सुरू असताना, प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन मोडीतज्ज्ञ नेमण्याचा नियम कागदावरच राहिला आहे.

# ‘मोडी लिपी एआय’ हा आशेचा किरण?

परिणामी, हजारो अर्जदारांचे भवितव्य लाल फितीत अडकले आहे आणि शासनाची प्रक्रिया ठप्प झाली आहे. ही केवळ आरक्षणापुरती मर्यादित समस्या नाही, तर जमिनीचे वाद, वारसा हक्काचे दावे आणि न्यायालयीन प्रकरणांमध्येही ऐतिहासिक दस्तऐवजांची गरज भासते. या समस्येमुळे आपल्या ऐतिहासिक वारशाशी असलेली नाळही तुटण्याचा धोका आहे. एकट्या पुणे अभिलेखागारातील ३९ हजार ‘रुमालांमध्ये’ बंदिस्त तब्बल चार कोटी दस्तऐवजांपैकी ८० टक्के कागदपत्रे आजपर्यंत कोणी वाचलेलीच नाहीत. याचे कारणही मोडी लिपीतज्ज्ञांची कमतरता हेच आहे.

आता पारंपरिक उपायांपलीकडे जाऊन तंत्रज्ञानाची मदत घेणे अटळ आहे.मोडी लिपीचे देवनागरीत लिप्यंतर करण्यासाठी अनेक प्रयत्न झाले आहेत पण आयआयटी रुरकी येथील प्रा. स्पर्श मित्तल आणि त्यांच्या



टीमने विकसित केलेले MOSCNET हे केवळ एक साधे सॉफ्टवेअर नसून यात अद्यायावत एआय प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. व्हिजन-लँग्वेज मॉडेल (VLM): व्हीएलएम न्युरल नेटवर्कवर आधारित आहे. पारंपरिक ऑप्टिकल कॅरॅक्टर रेकग्निशन (OCR) किंवा हँडरायटिंग टेक्स्ट रेकग्निशन (HTR) तंत्रज्ञान अनेकदा अक्षरे किंवा जोडशब्द तोडून वाचण्याचा प्रयत्न करतात. मोडी लिपीच्या सलग आणि वळणदार ( CURSIVE) स्वरूपामुळे ही पद्धत अयशस्वी ठरते. याउलट, व्हीएलएम दोन वेगवेगळ्या माहिती स्रोतांना जोडते: एक म्हणजे दस्तऐवजाचे दृश्य स्वरूप (IMAGE) आणि दुसरे म्हणजे त्यातील भाषिक मजकूर (TEXT). हे मॉडेल मोडी लिपीतील शब्दांकडे केवळ तुटक अक्षरांचा समूह म्हणून पाहत नाही, तर एक सलग चित्र म्हणून पाहून त्यातील भाषिक नमुने ओळखते, ज्यामुळे ते मोडीच्या मूळ स्वरूपाला चांगल्या प्रकारे हाताळू शकते. MOSCNET च्या कार्यक्षमतेमागे नॉलेज डिस्टिलेशन हे प्रगत तंत्रज्ञान आहे. यामध्ये एका मोठ्या, शक्तिशाली शिक्षक मॉडेलकडून एका लहान, सुटसुटीत विद्यार्थी मॉडेलला शिकवले जाते. विद्यार्थी मॉडेल मूळ शिक्षक मॉडेलपेक्षा १६३ पट लहान असूनही अधिक चांगली कामगिरी करत आहे. या तंत्रज्ञानाचा थेट परिणाम धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे हे मॉडेल वापरण्यासाठी उच्च क्षमतेच्या महागड्या संगणकांची गरज नाही. अशा प्रकारचे मॉडेल जिल्हास्तरीय पुराभिलेखागार किंवा तहसील कार्यालयांसारख्या कमी-संसाधने असलेल्या ठिकाणीही वापरता येऊ शकते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ।।१।।

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ।।२।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## महिला कौतुक सोहळा

## फडणवीस यांच्याशी चर्चा करून दोन दिवसांत निर्णय

# जमनाबाई गायकवाड यांचे स्मारक लवकरच !

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराणी जमनाबाई गायकवाड यांनी प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करीत गौरवशाली इतिहास निर्माण केला. त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान झाला पाहिजे. हा इतिहास पुढील पिढीला कळला पाहिजे, यासाठी रहिमतपूरनगरीत महाराणी जमनाबाई गायकवाड यांचे स्मारक लवकरच उभे करण्यात येईल असे आश्वासन आशिष शेलार यांनी दिले. तसेच सातारा येथील शाही दसरा महोत्सवास राज्य महोत्सव दर्जा देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून दोन दिवसांत निर्णय घेण्यात येईल, असेही शेलार यांनी सांगितले.**

## इतिहास पुढील पिढीला कळला पाहिजे



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली 'लाडकी बहीण योजना' ही आता महिलांच्या आत्मसन्मानाचे प्रतीक बनली आहे. त्यांच्या प्रति कृतज्ञता व महिलांचा सन्मान करण्यासाठी भाजपा महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा चित्रलेखा माने - कदम आणि 'दोन तास समाजासाठी महिला ग्रुप' यांच्यावतीने रहिमतपूर येथे आयोजित 'महिला कौतुक सोहळ्यात' शेलार बोलत होते. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष आ. डॉ. अतुल भोसले, आ. मनोज घोरपडे, चित्रलेखा माने - कदम, पंचक्रोशी शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष अमरसिंह जाधवराव, सुरभीताई भोसले, प्रियंका कदम यासह मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधान मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महिलांची काळजी घेणारे व त्यांच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत राहणारे नेतृत्व आहे. विविध योजनांच्या माध्यमातून त्यांनी महिलांना सक्षम केले आहे. महिलांना विविध अधिकार दिले आहेत. असे सांगून शेलार म्हणाले की, विरोधक 'लाडकी बहीण योजना' बंद पडणार, असा अपप्रचार करीत आहेत. पण मी वचन देतो, ही योजना बंद पडणार नाही. तर उलट यामध्ये अधिक वाढ होईल. त्यामुळे विरोधकांच्या भूलथापांना बळी पडू नका.चित्रलेखाताई माने -कदम वेगवेगळ्या माध्यमातून समाजसेवा करीत आहेत. महिलांचे उत्तम संघटन त्यांनी केले आहे. हा अनोखा उपक्रम महिला शक्तीला बळकटी देणारा आहे. यावेळी आ. डॉ. अतुल भोसले, मनोज घोरपडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी सुनेषा शहा, दैवशीला मोहिते, अश्विनी हुबळीकर, निशा जाधव, वैष्णवी कदम, वैशाली टंकसाळे, वैशाली मांढरे, माजी नगराध्यक्ष संपतराव माने, विविध संस्थांचे पदाधिकारी, तेजस्विनी महिला मंडळ पदाधिकारी, सदस्या, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## विकासासाठी सातत्याने कार्यरत

ण मी वचन देतो, ही योजना बंद पडणार नाही. तर उलट यामध्ये अधिक वाढ होईल. त्यामुळे विरोधकांच्या भूलथापांना बळी पडू नका.चित्रलेखाताई माने -कदम वेगवेगळ्या माध्यमातून समाजसेवा करीत आहेत. महिलांचे उत्तम संघटन त्यांनी केले आहे. हा अनोखा उपक्रम महिला शक्तीला बळकटी देणारा आहे. यावेळी आ. डॉ. अतुल भोसले, मनोज घोरपडे यांनी मनोगत व्यक्त केले.महिलांच्या आत्मसन्मानाचे प्रतीक बनली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली 'लाडकी बहीण योजना' ही आता महिलांच्या आत्मसन्मानाचे प्रतीक बनली आहे. त्यांच्या प्रति कृतज्ञता व महिलांचा सन्मान करण्यासाठी भाजपा महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा चित्रलेखा माने - कदम आणि 'दोन तास समाजासाठी महिला ग्रुप' यांच्यावतीने रहिमतपूर येथे आयोजित 'महिला कौतुक सोहळ्यात' शेलार बोलत होते. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष आ. डॉ. अतुल भोसले, आ. मनोज घोरपडे, चित्रलेखा माने - कदम, पंचक्रोशी शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष अमरसिंह जाधवराव, सुरभीताई भोसले, प्रियंका कदम यासह मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधान मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महिलांची काळजी घेणारे व त्यांच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत राहणारे नेतृत्व आहे. विविध योजनांच्या माध्यमातून त्यांनी महिलांना सक्षम केले आहे. महिलांना विविध अधिकार दिले आहेत. असे सांगून शेलार म्हणाले की, विरोधक 'लाडकी बहीण योजना' बंद पडणार, असा अपप्रचार करीत आहेत. पण मी वचन देतो, ही योजना बंद पडणार नाही. तर उलट यामध्ये अधिक वाढ होईल. त्यामुळे विरोधकांच्या भूलथापांना बळी पडू नका.चित्रलेखाताई माने -कदम वेगवेगळ्या माध्यमातून समाजसेवा करीत आहेत. महिलांचे उत्तम संघटन त्यांनी केले आहे. हा अनोखा उपक्रम महिला शक्तीला बळकटी देणारा आहे.

# 'रेलनीर' पाण्याची बाटली झाली स्वस्त

## 22 सप्टेंबरपासून स्वस्त दरात मिळणार 'रेलनीर' पाणी बाटली

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**रेल्वे स्थानक आणि लांबपल्याच्या रेल्वेगाड्यांमध्ये 'रेलनीर' बाटलीबंद पाण्याचा पुरवठा केला जातो. रेल्वे मंडळाने २० सप्टेंबर रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, 'रेलनीर' बाटली एक रुपयाने स्वस्त होणार आहे. त्यामुळे एका लिटर पाण्याच्या बाटलीसाठी १५ रुपयांऐवजी १४ रुपये आणि ५०० मिली बाटलीसाठी १० रुपयांऐवजी ९ रुपये द्यावे लागणार आहेत.**




संपूर्ण देशभरातील रेल्वे विभागात सुधारित दर २२ सप्टेंबरपासून लागू होतील.'रेलनीर' बाटलीबंद पिण्याचे पाणी हा भारतीय रेल्वेचा ब्रँड असून इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टूरिझम कॉर्पोरेशनतर्फे (आयआरसीटीसी) 'रेलनीर' बाटल्यांच्या पाण्याचा पुरवठा रेल्वे स्थानकात आणि मेल-एक्स्प्रेसमध्ये केला जातो. मध्य रेल्वेवरील सीएसएमटी - कसारा/कर्जत, पश्चिम रेल्वेवरील चर्चगेट - विरारपर्यंत सर्व रेल्वे स्थानकांत, हार्बर मार्गावरील सर्व रेल्वे स्थानके, वापी आणि वलसाड स्थानकांत 'रेलनीर' बाटलीबंद पाण्याचा पुरवठा केला जातो. परंतु, काही वेळा रेलनीरचे उत्पादन घटल्यावर पाण्याच्या बाटल्यांचा अपुरा पुरवठा होतो. यावेळी भारतीय रेल्वेने निवडलेल्या इतर ब्रँडच्या पाण्याच्या बाटल्या विकल्या जातात. या बाटल्यांच्या किमतीतही बदल करण्यात आला

## नवीन दरांचे पालन करण्याचे निर्देश

भारतीय रेल्वेचे सर्व महाव्यवस्थापक आणि आयआरसीटीसीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकांसाठी एक परिपत्रक जारी करण्यात आले आहे. या परिपत्रकात सर्व संबंधित विभागांना २२ सप्टेंबरपासून नवीन दरांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.आयआरसीटीसीच्या पश्चिम विभागाचे सात रेलनीर प्रकल्प कार्यान्वित आहेत. या प्रकल्पातून दररोज लाखो रेल्वे प्रवाशांना स्वच्छ आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. अंबरनाथ, बुटीबोरी (नागपूर), मानेरी (जबलपूर), मंडीदीप (भोपाळ), कुबेर एक्सटेंशन रामपुरा (राजस्थान), साणंद (गुजरात), औद्योगिक क्षेत्र (भुसावळ) या सात ठिकाणी रेलनीरच्या पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे उत्पादन होते.

## व्यापार करार मार्गी | पीयूष गोयल सोमवारी जाणार अमेरिकेच्या दौऱ्यावर

# भारत-अमेरिका व्यापार करार मार्गी लागणार?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि अमेरिका यांच्यात केल्या काही दिवसांपासून व्यापारी तणाव वाढला आहे. भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्याच्या मुद्द्यावरून डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय मालावर ५० टक्के टॅरिफ लादण्याचा निर्णय घेतला. यानंतर दोन्ही देशातील संबंध बिघडल्याचे पाहायला मिळाले होते.मात्र आता हळूहळू हे संबंध पूर्वपदावर आणण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल हे सोमवारी, २२ सप्टेंबर रोजी व्यापारासंबंधी चर्चेसाठी अमेरिकेला जाणार आहेत. यासंबंधीची माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने शनिवारी दिली आहे.**

## पीयूष गोयल अमेरिकेच्या दौऱ्यावर



या आठवड्यात नवी दिल्ली येथे एक बैठक पार पडली, ज्यामध्ये दक्षिण आणि मध्य आशियासाठी अमेरिकेचे सहायक व्यापार प्रतिनिधी (USTR) ब्रेंडन लिंच यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकन शिष्टमंडळाने भारतीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. त्यानंतर आता केंद्रीय मंत्री अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत.अमेरिकेतून आलेल्या सहायक यूएसटीआरच्या नेतृत्वाखालील व्यापार प्रतिनिधींच्या एका पथकाने अमेरिकेबरोबर सुरू अलेल्या व्यापार करारासंबंधीच्या वाटाघाटी पुढे घेऊन जाण्यासाठी, १६ सप्टेंबर रोजी वाणिज्य मंत्रालयाबरोबर बैठक झाली. यावेळी सकारात्मक आणि भविष्याबद्दल चर्चा झाली, ज्यामध्ये व्यापार कराराबाबतच्या विविध अंगांनी विचार करण्यात आला. परस्पर फायद्याचा करार लवकरच पूर्ण करण्यासाठी प्रयत्न आणखी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला," असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी सांगितले.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या महिन्यात रशियन तेल घरेदी करण्याच्या मुद्द्यावरून भारतीय मालावर ५० टक्के टॅरिफ लादले होते. भारत आणि अमेरिका यांच्यात केल्या काही दिवसांपासून व्यापारी तणाव वाढला आहे. भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्याच्या मुद्द्यावरून डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय मालावर ५० टक्के टॅरिफ लादण्याचा निर्णय घेतला. यानंतर दोन्ही देशातील संबंध बिघडल्याचे पाहायला मिळाले होते.मात्र आता हळूहळू हे संबंध पूर्वपदावर आणण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल हे सोमवारी, २२ सप्टेंबर रोजी व्यापारासंबंधी चर्चेसाठी अमेरिकेला जाणार आहेत. यासंबंधीची माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने शनिवारी दिली आहे.

## दिल्लीत चर्चा सुरू झाली

भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्याच्या मुद्द्यावरून डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय मालावर ५० टक्के टॅरिफ लादण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दोन्ही देशांमध्ये तणाव चांगलाच वाढला होता. आता अखेर दोन्ही देशांमध्ये थांबलेल्या वाटाघाटी पुन्हा सुरू झाल्या आहेत दिल्लीत चर्चा सुरू झाली त्याच दिवशी डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या.

या आठवड्यात नवी दिल्ली येथे एक बैठक पार पडली, ज्यामध्ये दक्षिण आणि मध्य आशियासाठी अमेरिकेचे सहायक व्यापार प्रतिनिधी (USTR) ब्रेंडन लिंच यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकन शिष्टमंडळाने भारतीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. त्यानंतर आता केंद्रीय मंत्री अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत.अमेरिकेतून आलेल्या सहायक यूएसटीआरच्या नेतृत्वाखालील व्यापार प्रतिनिधींच्या एका पथकाने अमेरिकेबरोबर सुरू अलेल्या व्यापार करारासंबंधीच्या वाटाघाटी पुढे घेऊन जाण्यासाठी, १६ सप्टेंबर रोजी वाणिज्य मंत्रालयाबरोबर बैठक झाली. यावेळी सकारात्मक आणि भविष्याबद्दल चर्चा झाली, ज्यामध्ये व्यापार कराराबाबतच्या विविध अंगांनी विचार करण्यात आला.

परस्पर फायद्याचा करार लवकरच पूर्ण करण्यासाठी प्रयत्न आणखी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला," असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी सांगितले.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या महिन्यात रशियन तेल घरेदी करण्याच्या मुद्द्यावरून भारतीय मालावर ५० टक्के टॅरिफ लादले होते. भारत आणि अमेरिका यांच्यात केल्या काही दिवसांपासून व्यापारी तणाव वाढला आहे.

# मोदी भारताचे पंतप्रधान कमकुवत आहेत

## ट्रम्प यांनी H-1B व्हिसा शुल्क वाढवल्याने राहुल गांधींची मोदींवर टीका

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने शुक्रवारी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे, ज्यानुसार एच १ बी व्हिसासाठी नवीन अटी लागू करण्यात आल्या असून एच १ बी व्हिसा अर्जासाठी १000,000 डॉलर्स इतकी फी जाहीर करण्यात आली आहे. या निर्णयाचा फटका अमेरिकेतील आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या भारतीय नागरिकांना बसणार आहे.**



या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शनिवारी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे.लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी यांनी कमकुवत पंतप्रधान म्हटले आहे. पंतप्रधान भारतीयांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यात अपयशी ठरल्याच्या मुद्द्यावरून ही टीका करण्यात आली आहे.

राहुल गांधी यांनी त्यांची २०१७ साली पंतप्रधानांवर टीका करत केलेली एक्सवरील पोस्ट रिपोस्ट केली आहे. ज्यामध्ये त्यांनी, "भारताचे पंतप्रधान कमकुवत आहेत," असे म्हटले होते.तसेच त्यांनी आता एक नवीन पोस्ट केली आहे, ज्यामध्ये अमेरिकेने एच-१बी बाबत घेतलेल्या निर्णयासंबंधीत लेखाचा स्क्रिनशॉट्स शेअर करत त्यांनी , "मी पुन्हा सांगतो, भारताला कमकुवत पंतप्रधान लाभले आहेत," असे म्हटले आहे. अमेरिकेने एच-१बी व्हिसाच्या फीमध्ये प्रचंड वाढ केली आहे, ज्यामुळे परदेशी नागरिकांना नोकरीवर घेणाऱ्या संस्थांना प्रत्येक अर्जासाठी १000,000 डॉलर देणे अनिवार्य झाले आहे.

## २०,००० व्हिसा राखीव आहेत

तीन वर्षांसाठी वैध असलेल्या आणि एकदा नूतनीकरण करता येणाऱ्या एच-१बी व्हिसाची प्रतिवर्षाची मर्यादा ६५,००० पर्यंत आहे. तर अमेरिकन विद्यापीठांमधील उच्च पदवीधारकांसाठी २०,००० व्हिसा राखीव आहेत. अमेरिकन सरकारच्या आकडेवारीनुसार गेल्या वर्षी एकूण ए -१बी व्हिसापैकी भारतीयांचा वाटा ७१ टक्के होता. तर त्या खालोखाल चीन ११.७ टक्क्यांसह दुसऱ्या क्रमाकांवर होता.

# ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ पोहोचली ऑस्ट्रेलियात!

‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ हा कार्यक्रम घराघरांत लोकप्रिय आहे. यामधील प्रत्येक विनोदवीर प्रेक्षकांना आपलासा वाटतो. हास्यजत्रेमुळे अनेक नवोदित कलाकारांना एक वेगळी ओळख मिळाली. परदेशातील प्रेक्षकांना सुद्धा या कार्यक्रमाची तुफान क्रेझ आहे. त्यामुळे हास्यजत्रेची टीम अनेकदा परदेश दौऱ्यावर जाऊन तेथील प्रेक्षकांचं मनोरंजन करत असते. गेल्यावर्षी ही संपूर्ण टीम अमेरिका दौऱ्यावर गेली होती. आता यंदाच्या वर्षी महाराष्ट्राला खळखळून हसवणारे हे विनोदवीर ऑस्ट्रेलियात पोहोचले आहेत. ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ची संपूर्ण टीम ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेली असून याठिकाणी सिडनी, मेलबर्न अशा महत्त्वाच्या शहरांमध्ये हे कलाकार लाइव्ह परफॉर्म करणार आहेत. विनोदवीरांसह या कार्यक्रमाची सूत्रसंचालिका अभिनेत्री प्राजक्ता माळी देखील ऑस्ट्रेलियात पोहोचली आहे. याठिकाणी या संपूर्ण टीमने मिळून एका ट्रेंडिंग गाण्यावर जबरदस्त डान्स केला. याचा खास व्हिडीओ प्राजक्ताने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे.ऑस्ट्रेलियाच्या समुद्रकिनारी प्राजक्तासह पृथ्वीक प्रताप, सचिन मोटे, समीर चौघुले, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रसाद खांडेकर, ओंकार राऊत, चेतना भट या सगळ्या कलाकारांनी मिळून “कुडिये नी...” या लोकप्रिय गाण्यावर डान्स केला.“आम्ही ऑस्ट्रेलियात एकत्र अशी मजा करतोय... सचिन मोटे सर सुद्धा सामील झाले, याचा विशेष आनंद!” असं कॅप्शन प्राजक्ता माळीने या व्हिडीओला दिलं आहे.

# सुमीत पुसावळेचं कुटुंबीयांसह सेलिब्रेशन

‘स्टार प्रवाह’ वाहिनीवर लवकरच ‘घरोघरी मातीच्या चुली’ ही नवी मलिका सुरू होणार आहे. अभिनेत्री रेश्मा शिंदे, सविता प्रभुणे, प्रमोद पवार, उदय नेने, आरोही सांबरे अभिनीत ही मालिका १८ मार्चपासून संध्याकाळी ७.३० वाजता पाहायला मिळणार आहे. या मालिकेत हृषिकेश या प्रमुख भूमिकेसाठी अभिनेता सुमीत पुसावळेची वर्णी लागली आहे. याआधी सुमीत ‘बाळूमामाच्या नावानं चांगभलं’ या मालिकेत झळकला होता. पण आता मालिकेतून त्याने एक्झिट घेत तो नव्या रुपात भेटीस येणार आहे. अलीकडेच अभिनेता सुमीत पुसावळे ‘घरोघरी मातीच चुली’ या मालिकेत झळकणार असल्याचं जाहीर झालं. तेव्हापासून तो चर्चेत आला आहे. सुमीतने या नव्या प्रवासानिमित्ताने कुटुंबियांबरोबर सेलिब्रेशन केलं. याचा व्हिडीओ अभिनेत्याची बायको मोनिका पुसावळेने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. याशिवाय मोनिकाने सुमीतसाठी इन्स्टाग्राम स्टोरीवरही खास पोस्ट लिहिल्या होत्या.‘बाळूमामांच्या नावानं चांगभलं’ या मालिकेतील सुमीतचा प्रवास संपल्याच्यानिमित्ताने मोनिकाचे काही फोटो शेअर करत पोस्ट लिहिली. मोनिकाने लिहिलं की, सुमीत तुझ्या कामाबद्दलचं प्रेम, निष्ठा, मामांवरचं प्रेम, विश्वास हे सगळं मी खूप जवळून अनुभवलं आहे. तू मामांचं कार्य घराघरात पोहोचवलं. उन्ह असो, पाऊस असो कधी तू आणि तुझी टीम थांबली नाही. मला आज बायको म्हणून खूप अभिमान वाटतोय. तुला प्रत्येकाने जे प्रेम दिलं आहे ते असंच कायम राहो आणि तुझ्या मनातल्या सर्व इच्छा पूर्ण व्हावी हिच मामांच्या चरणी प्रार्थना.

# साराची सर्वोत्कृष्ट भूमिका?



सारा अली खान नावाच्या अभिनेत्रीची आजवरची सर्वोत्कृष्ट भूमिका म्हणून तिच्या ए वतन मेरे वतन नावाच्या चित्रपटाचे नाव सांगावे लागेल. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया सोशल (AE WATAN MERE WATAN TRAILER NEWS) मीडियावर नेटकऱ्यांकडून येत आहेत. त्याला कारण या चित्रपटाचा व्हायरल झालेला ट्रेलर. बऱ्याच दिवसांपासून या चित्रपटाच्या ट्रेलरची चर्चा रंगली आहे. गेल्या वर्षी सारानं तिच्या चित्रपटांनं नेटकऱ्यांचे, चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. तिचा विकी कौशल सोबत प्रदर्शित झालेला चित्रपटही चर्चेचा (SARA ALI KHAN VIRAL NEWS) विषय होता. या सगळ्यात ॲमेझॉन प्राईमवर प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटातून साराचा एक वेगळाच अंदाज दिसून येतो. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा तो काळ. इंग्रजांची ती जुलमी राजवट मोडून काढण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीनं मोहिमा सुरु होत्या. त्यातील एका मोहिमेचं प्रतिनिधीत्व सारा अली खान करते आहे.मेरे वतन हा अशा एका महिलेची कथा सांगतो जिनं तिच्या धाडसीपणानं देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्वाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटामध्ये सारानं उषा नावाच्या मुलीची भूमिका वठवली असून त्यात तिचा स्वातंत्र्याप्रतीचा संघर्ष दिसून आला आहे. १९४२ साली भारत छोडो जे आंदोलन छेडले गेले त्यात भूमीगत राहून रेडिओ स्टेशन चालवण्याचे काम उषांनं केलं होतं. ते हे या चित्रपटातून दिसून येते. ट्रेलरच्या सुरुवातीला दिसते की, सारा अली खान ही हातात तिरंगा घेतलेली दिसते.

# अरेंज मॅरेजमधून उलगडणार लव्ह स्टोरी

लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वेने नेहमीच चर्चेत असते. ‘देवयानी’ या मालिकेतून शिवानी घराघरांत पोहचली. काही महिन्यांपूर्वीच तिचा झिम्मा २ चित्रपट प्रदर्शित झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसादम मिळाला होता. मराठीबरोबर शिवानीने हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. आता लवकरच शिवानी ‘ऊन सावली’ चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर भूषण प्रधानची प्रमुख भूमिका आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. ‘ऊन सावली’ हा चित्रपट प्रणय आणि आन्वीची प्रेमकथा आहे. ‘एक अरेन्ज मॅरेज ही अद्भुत लव स्टोरी असू शकते’ ह्या वाक्यात ‘ऊन सावलीचे’ गूढ लपलेले आहे. एकमेकांच्या डोळ्यात डोळे घालून पाहणारे हे सुंदर जोडपं बरच काही सांगू पाहत आहे, बरच काही बोलू इच्छित आहेत. पहिल्या भेटीतच प्रणयला आन्वी आवडते. परंतु आन्वीचा विरोध हा कायम आहे. तिच्या मनात तर वेगळाच गोंधळ चालू आहे. हा चित्रपट लग्न करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला स्वतःशी जोडणारा आहे.तिकीट विंडो पिक्चर्स बॅनरअंतर्गत समीर ए शेखद्वारा या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. सार्थक नकुल यांनी या चित्रपटाला संगीत दिले आहे. या चित्रपटात भूषण व शिवानीबरोबर अजिंक्य ननावरे, राज सरनागत, अंकिता भोईर, विकास हांडे, श्वेता कामत, प्रिया तुळजापूरकर आणि मनाली निकम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या १५ मार्चला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वेने नेहमीच चर्चेत असते. ‘देवयानी’ या मालिकेतून शिवानी घराघरांत पोहचली. काही महिन्यांपूर्वीच तिचा झिम्मा २ चित्रपट प्रदर्शित झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसादम मिळाला होता. मराठीबरोबर शिवानीने हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. आता लवकरच शिवानी ‘ऊन सावली’ चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर भूषण प्रधानची प्रमुख भूमिका आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. ‘ऊन सावली’ हा चित्रपट प्रणय आणि आन्वीची प्रेमकथा आहे. ‘एक अरेन्ज मॅरेज ही अद्भुत लव स्टोरी असू शकते’ ह्या वाक्यात ‘ऊन सावलीचे’ गूढ लपलेले आहे. एकमेकांच्या डोळ्यात डोळे घालून पाहणारे हे सुंदर जोडपं बरच काही सांगू पाहत आहे, बरच काही बोलू इच्छित आहेत.

# माझ्या सर्व चाहत्यांचे खूप आभार मानते



मनिषा राणी ही आता झलक दिखला जा च्या अकराव्या सीझनची विजेती झाली आहे. त्यानंतर तिची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून तिच्या नावाची जोरदार चर्चा होती. अखेर तिच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. सोशल मीडियावर एक दिवस अगोदरच मनिषाचं नाव विजयी म्हणून समोर आले होते. टीव्ही मनोरंजन क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून सुरु असणाऱ्या रियॅलिटी शो मध्ये झलक दिखला जा चे नाव घेता येईल. या रियॅलिटी शो चा अकरावा सीझन पार पडला असून त्यातील सहभागी स्पर्धकांविषयी चाहत्यांना कमालीची उत्सुकता असल्याचे दिसून आले आहे. अशातच मनिषा राणीनं विजेतेपद मिळवल्यानंतर तिनं दिलेल्या प्रतिक्रियेनं नेटकऱ्यांच्या चर्चेला उधाण आले आहे. सोशल मीडियावर मनिषाच्या नावाची चर्चा आहे. ती विजयी होताच तिच्याव चाहत्यांनी, नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. या सगळ्यात मनिषाची प्रतिक्रिया देखील चर्चेत आली आहे. ती नेमकी काय म्हणाली हेही आपण जाणून घेऊयात. मनिषाला झलक दिखला जा चे विजेतेपद मिळवल्यानंतर तिला ३० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात आले. त्यानंतर तिनं इंस्टावरुन चाहत्यांचे आभार मानले आहेत. तिनं म्हटलं आहे की, मी माझ्या सर्व चाहत्यांचे खूप आभार मानते. त्यांच्या मुळेच हा प्रवास शक्य झाला. त्यांनी केलेल्या सहकार्याविषयी मी त्यांची आभारी आहे.त्या व्हिडिओच्या शेवटी ती म्हणते की, मी आता जे काही पाहते आहे ते सगळं खरं आहे यावर माझा विश्वासच बसत नाही. माझ्यासाठी एक ते दीड लाख वोटिंग एका दिवसांत आली. मला एवढं प्रेम मिळालं हेच माझ्यासाठी खूप आहे. लोकांनी मला जे खूप सहकार्य केले त्यासाठी त्यांना धन्यवाद. अशा शब्दांत मनीषा राणीनं तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत.टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध रियॅलिटी शो झलक दिखला जा च्या अकराव्या सीझनचा ग्रँड सीझन नुकताच पार पडला.त्याला बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री हुमा कुरेशी हजर होती. यावेळी बिग बॉसच्या १७ व्या सीझनचा विजेता मुनव्वर देखील उपस्थित होता. या सगळ्यात एका व्हिडिओनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. मनीषा रानीनं यंदाच्या झलक दिखजा चे विजेतेपद मिळवून आपल्या नावाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. बऱ्याच दिवसांपासून झलक दिखला जा ची चर्चा होती. अखेर त्याचा यंदाचा सीझन संपला असून त्यानं चाहत्यांचा निरोप घेतला आहे. या सगळ्यात शेवटच्या एपिसोडमध्ये चर्चा रंगली होती ती हुमा कुरेशी आणि मुनव्वर फारुखीची. त्यानं तिची टिंगल केल्याचे दिसून आले आहे.

आशिया चषक २०२५

## दोन्ही संघांमध्ये सुपर ४ फेरीतील सामना रंगणार

# कधी रंगणार IND vs PAK सामना?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेतील सुपर ४ फेरीतील सामन्यांना सुरुवात झाली आहे. सुपर ४ फेरीतील पहिला सामना श्रीलंका आणि बांगलादेश या दोन्ही संघांमध्ये पार पडला. तर दुसऱ्या सामन्यात कट्टर प्रतिस्पर्धी भारत – पाकिस्तान संघ आमनेसामने येणार आहेत. हे दोन्ही संघ या स्पर्धेत दुसऱ्यांदा आमनेसामने येणार आहेत. याआधी झालेल्या साखळी फेरीतील सामन्यात भारताने पाकिस्तानचा एकतर्फी पराभव केला होता. या सामन्यात हस्तांदोलन न करण्यावरून चांगलाच वाद पेटला होता.**

## सामना कुठे पाहता येणार?







आता दोन्ही संघ पुन्हा एकदा भिडणार आहेत. दरम्यान हा सामना केव्हा, कुठे आणि किती वाजता सुरू होणार? जाणून घ्या. याआधी ओमानविरुद्ध झालेला सामना अबुधाबीच्या मैदानावर रंगला होता. मात्र, सुपर ४ चा सामना दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होईल. तर नाणेफेक ७:३० वाजता होईल. याआधी झालेला साखळी फेरीतील सामना देखील याच मैदानावर पार पडला होता. या सामन्यात भारतीय फलंदाज आणि गोलंदाजांनीही दमदार कामगिरी केली होती. आता भारतीय संघ हा सामना जिंकून सुपर ४ फेरीत दमदार सुरूवात करण्याच्या प्रयत्नात असणार आहे.भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणाऱ्या सामन्याचा थरार तुम्ही सोनी स्पोर्ट्स नेटवर्कवर लाईव्ह पाहू शकता. या सामन्याचे लाईव्ह प्रक्षेपण तुम्ही सोनी स्पोर्ट्स १,२,३ आणि ५ वर पाहू शकता. जर तुम्हाला हा सामना मोबाईलवर पाहायचा असेल, तर तुम्ही सोनी लिव आणि फॅनकोड ॲपवर लाईव्ह पाहू शकता. पण यासाठी तुमच्याकडे सब्स्क्रिप्शन असणं गरजेचं आहे. यासह हा सामना तुम्ही डीडी स्पोर्ट्सवर लाईव्ह पाहू शकता.आशिया चषक २०२५ स्पर्धेत पुन्हा एकदा भारत – पाकिस्तान आमनेसामने येणार आहेत. साखळी फेरीत झालेल्या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानवर ७ गडी राखून एकतर्फी विजयाची नोंद केली होती. आता रविवारी दोन्ही संघ सुपर ४ मध्ये भिडणार आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा हाय व्होल्टेज सामना पाहायला मिळणार आहे. या सामन्याआधी दोन्ही संघांच्या कर्णधाराची पत्रकार परिषद होणार होती. पण पाकिस्तानने या पत्रकार परिषदेवर बहिष्कार टाकला. पत्रकार परिषद सुरू होण्याच्या काही तासांपूर्वी ही पत्रकार परिषद रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## रात्री ८ वाजता सुरू होईल

आता दोन्ही संघ पुन्हा एकदा भिडणार आहेत. दरम्यान हा सामना केव्हा, कुठे आणि किती वाजता सुरू होणार? जाणून घ्या. याआधी ओमानविरुद्ध झालेला सामना अबुधाबीच्या मैदानावर रंगला होता. मात्र, सुपर ४ चा सामना दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होईल.

पाकिस्तानने पत्रकार परिषदेवर बहिष्कार टाकण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी यूएईविरुद्ध झालेल्या सामन्यात देखील पाकिस्तानच्या कर्णधाराने पत्रकार परिषद रद्द करण्याचा निर्णय घेतला होता.याआधी भारतीय संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात हस्तांदोलन न केल्याने चांगलाच वाद रंगला होता. पीसीबीने सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना स्पर्धेबाहेर करण्याची विनंती केली होती. पण आयसीसीने पीसीबीच्या विरोधात निर्णय दिला होता. त्यामुळे पीसीसीबीने यूएईविरुद्धच्या सामन्याआधीची पत्रकार परिषद रद्द केली होती.पीसीबीने अँडी पायक्रॉफ्ट यांच्यावर गंभीर आरोप केले होते. हे आरोप आयसीसीने फेटाळून लावले. आयसीसीने स्पष्टपणे सांगितलं की, अँडी पायक्रॉफ्ट यांनी केवळ आशियाई क्रिकेट परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशाचं पालन केलं होतं आणि सामना सुरू व्हायला अवघे काही मिनिटे शिल्लक होते.याउलट आयसीसीने पीसीबीवर खेळाडू आणि संघ व्यवस्थापकातील सदस्यांनी आचारसंहितेचं उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. पीसीबीने हे सर्व आरोप फेटाळून लावले. हे प्रकरण संपायच्या आधीच आता पाकिस्तानने पत्रकार परिषद रद्द करण्याचा निर्णय घेतला. माध्यमातील वृत्तानुसार, माध्यमांपासून दूर राहण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याचं म्हटलं जात आहे. एकीकडे पाकिस्तानचा संघ आपल्या अडचणी वाढवत आहे. तर दुसरीकडे भारतीय संघ सुपर ४ फेरीसाठी कसून सराव करत आहे.

# मानधनाचा झंझावात; ५० चेंडूत शतकी खेळी

## महिला वनडे क्रिकेटमधलं दुसरं वेगवान शतक

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियाने दिलेल्या ४१३ धावांच्या डोंगराएवढ्या लक्ष्यासमोर खेळताना डगमगून न जात भारताची सलामीवीर स्मृती मान्धनाने तिसऱ्या वनडेत ५० चेंडूत शतकी खेळी साकारली. स्मृतीने १४ चौकार आणि ४ षटकारांसह विक्रमी शतक झळकावलं. स्मृतीचं वनडेतलं हे १३वं शतक आहे. महिला क्रिकेटमध्ये वनडे प्रकारातलं हे दुसरं वेगवान शतक आहे.**




ऑस्ट्रेलियाच्या मेग लॅनिंगने ४५ चेंडूत शतक झळकावलं होतं.भारतीय महिला क्रिकेटपटूने झळकावलेलं हे सगळ्यात वेगवान शतक आहे.काही दिवसांपूर्वी याच मालिकेतल्या मुल्लापूर इथे झालेल्या दुसऱ्या वनडेत स्मृतीने ११७ धावांची शतकी खेळी केली होती. तोच फॉर्म कायम राखत स्मृतीने आणखी एका खणखणीत शतक झळकावलं. तीन सामन्यांची मालिका १-१ अशा स्थितीत आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्यांदा मालिका जिंकण्याचं आव्हान भारतीय संघासमोर आहे.दिल्लीतल्या अरुण जेटली आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर

## आणखी एका खणखणीत शतक

काही दिवसांपूर्वी याच मालिकेतल्या मुल्लापूर इथे झालेल्या दुसऱ्या वनडेत स्मृतीने ११७ धावांची शतकी खेळी केली होती. तोच फॉर्म कायम राखत स्मृतीने आणखी एका खणखणीत शतक झळकावलं. तीन सामन्यांची मालिका १-१ अशा स्थितीत आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्यांदा मालिका जिंकण्याचं आव्हान भारतीय संघासमोर आहे.

सुरू असलेल्या लढतीत ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना ४१२ धावांची मजल मारली.

बेथ मूनीने २३ चौकार आणि एका षटकारासह ७५ चेंडूत १३८ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. जॉर्जिया वॉलने ८१ तर एलिसा पेरीने ६८ धावांची खेळी करत बेथला चांगली साथ दिली. भारतातर्फे अरुंधती रेड्डीने ३ तर रेणुका सिंग आणि दिप्ती शर्मा यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.ऑस्ट्रेलियाच्या मेग लॅनिंगने ४५ चेंडूत शतक झळकावलं होतं. भारतीय महिला क्रिकेटपटूने झळकावलेलं हे सगळ्यात वेगवान शतक आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
। दि. 21 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## प्रतिभा ज्युनिअर कॉलेजला इंडियन स्कूल

# एक्सलन्स अवार्डने सन्मान!

### शिक्षण विश्व: प्रतिभा ग्रुपची शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड| प्रतिनिधी: शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट या संस्थेच्या प्रतिभा ज्युनिअर कॉलेजला इंडियन स्कूल एक्सलन्स अवार्डने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार तन्मय पब्लिकेशन आणि सप्तरंग सकाळ यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके सभागृहात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.**




देशभरातील शैक्षणिक संस्थांमध्ये उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि समाजाशी असलेले योगदान यासाठी हा पुरस्कार दिला जातो.

या पुरस्कारामुळे प्रतिभा ज्युनिअर कॉलेजची शैक्षणिक क्षेत्रातील नेतृत्व भूमिका अधिक बळकट झाली आहे. संस्थेच्या शिक्षणाच्या दर्जात सातत्याने सुधारणा करण्याच्या प्रयत्नांना या सन्मानामुळे अधिक चालना मिळाली आहे. नवोन्मेषी शिक्षण पद्धती डिजिटल शिक्षण साधने कौशल्यविकास कार्यशाळा आणि सामाजिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांसाठी समृद्ध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कॉलेज अधिक कटिबद्ध झाले आहे असे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ वनिता कुऱ्हाडे यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या की हा देशातील प्रतिष्ठेचा मानला जाणारा पुरस्कार असून संस्थेबरोबर संपूर्ण शिक्षकवृंद विद्यार्थी आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांचा हा सन्मान आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता समर्पण आणि नवनवीन कल्पनांचा अवलंब करून आम्ही पुढेही उत्कृष्ट कामगिरी करत राहू.

या यशस्वीतेबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव डॉ दीपक शहा, खजिनदार डॉ भूपाली शहा, संचालिका डॉ तेजल शहा, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ राजेंद्र कांकरीया आदींनी अभिनंदन केले. प्राचार्या व प्राध्यापक शिक्षकवृंद यांचे कौतुक करण्यात आले आहे.

## सिद्धांत कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये इंडक्शन प्रोग्राम उत्साहात

### शिक्षण विश्व: नव्या शैक्षणिक धोरणातील बदलांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सिद्धांत कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सुदुंबरे पुणे येथे यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ प्रमोद पाटील आणि इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ सुरेश शिरबहादुरकर होते.**



कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपाध्यक्ष सिद्धांत यादव, प्राचार्य डॉ लक्ष्मण कांबळे, उपप्राचार्य डॉ उत्तम शिंदे, कुलसचिव हरिहर चौरे, शैक्षणिक समन्वयक प्रा आशिष राऊत प्रवेश, समन्वयक प्रा. भागवत केदार तसेच सर्व विभागप्रमुख व शिक्षकवृंद उपस्थित होते.

इंडक्शन प्रोग्रामचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाची ओळख करून देणे हा होता. डॉ प्रमोद पाटील यांनी नव्या शैक्षणिक धोरणातील बदलांबाबत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना मेहनतीने पुढे जाण्याचे आवाहन केले. डॉ. सुरेश शिरबहादुरकर यांनी तंत्रज्ञानाबरोबर सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत नवोपक्रमात्मक विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. प्राचार्य डॉ लक्ष्मण कांबळे यांनी विद्यार्थ्यांना ध्येय ठरवून सातत्याने प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचा सल्ला दिला.

महाविद्यालयात यावर्षीपासून बीई सायबर सुरक्षा हा महत्त्वाचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे मागील वर्षी सुरू झालेल्या इंटरनेट ऑफ थिंग्ज अभ्यासक्रमालाही विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. डॉ उत्तम शिंदे यांनी महाविद्यालयाची शैक्षणिक रचना प्रयोगशाळा सुविधा ग्रंथालय क्रीडा विभाग आणि नियमावली यांची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा सहकारी गटकार्य व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. ऋषिकेश मोरे यांनी केले आणि आभार प्रा. भागवत केदार यांनी मानले. कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नव्या प्रवासाची उत्सुकता आणि आत्मविश्वास दिसून आला. महाविद्यालयाच्या सर्व स्तरांतील समन्वयातून हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

## शिक्षण विश्व: 'मुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता

# 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा!

## एमआयटी एसीएससी आणि क्विक हील फाउंडेशनचा सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयटी कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाने क्विक हील फाउंडेशनच्या सहकार्याने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाचे आयोजन करून सायबर सुरक्षिततेबाबत महत्त्वपूर्ण जनजागृती घडवून आणली. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना तसेच प्राध्यापकांना डिजिटल युगात सायबर स्वच्छता आणि सुरक्षिततेचे मूलभूत ज्ञान देणे हा होता.**

या उपक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रभावी पथनाट्याने झाली. संपूर्ण मराठी भाषेत सादर करण्यात आलेल्या या नाटकात फिशिंग ऑनलाइन फसवणूक आणि सुरक्षित पासवर्डचे महत्त्व या संकल्पनांचे सुलभ भाषेत सादरीकरण करण्यात आले. स्थानिक भाषेचा वापर आणि प्रात्यक्षिक पद्धतीमुळे उपस्थितांमध्ये सायबर सुरक्षेविषयी अधिक गतीने आणि प्रभावीपणे जागरूकता निर्माण झाली.

कार्यक्रमात एमआयटीचे प्राध्यापक अमित ताले आणि क्विक हील फाउंडेशनचे अजय शिरके यांचे विशेष सहकार्य लाभले. यानंतर क्विक हीलचे तज्ज्ञ आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांनी सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. सायबर धोके कसे ओळखावेत वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याच्या पद्धती आणि इंटरनेटचा जबाबदारीने कसा वापर करावा या विषयांवर उपस्थितांशी संवाद साधण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी सह संचालिका डॉ अक्षदा कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले. सर्व सहभागींनी या उपक्रमातून सायबर सुरक्षेबाबतची सजगता आणि वैयक्तिक जबाबदारी यांची जाणीव घेऊन घरी परतले. हा उपक्रम केवळ महाविद्यालयापुरता मर्यादित न राहता समाजातील इतर घटकांवरही सकारात्मक परिणाम घडवील असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### पथनाट्यातून जागृती

क्विक हील फाउंडेशनचे अजय शिरके यांनी विद्यार्थ्यांनी पथनाट्यात दाखवलेल्या सर्जनशीलतेचे कौतुक करत सांगितले की अशा उपक्रमांमुळे सायबर गुन्ह्यांपासून बचाव करता येतो आणि सुरक्षित डिजिटल समाजाची पायाभरणी होते.

### सायबर सुरक्षेची गरज आणि जबाबदारीवर भर

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल बोलताना महाविद्यालयाचे संचालक डॉ बी बी वाफारे यांनी सांगितले की आजच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षा ही चैनीची बाब नसून काळाची गरज बनली आहे. क्विक हील फाउंडेशनच्या सहकार्याने घेतलेला हा उपक्रम केवळ तांत्रिक ज्ञान न देता विद्यार्थ्यांना जबाबदार डिजिटल नागरिक बनवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे.

---

## नेक्स्ट जेन जीएसटी रिफॉर्म' जनतेसाठी मोठी भेट

## भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटेंची माहिती



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमध्ये १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत भाजपचा 'सेवा पंधरवडा' आणि 'आत्मनिर्भर भारत' अभियानाचे आयोजन.**

आत्मनिर्भर भारत' हे केवळ एक अभियान न राहता, आता ते एक जनआंदोलन बनले आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देणे, लघु आणि मध्यम उद्योगांना आर्थिक मदत देणे आणि 'मेक इन इंडिया'ला गती देत आहे यातून भारताच्या प्रगती बरोबरच सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार असल्याचे पिंपरी चिंचवड भाजपाचे अध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या जनहितकारी योजना आणि भाजपच्या राष्ट्रव्यापी अभियानांची माहिती देण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) भाजपने पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यामध्ये भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी 'सेवा पंधरवडा', 'आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान' आणि नुकत्याच जाहीर झालेल्या जीएसटी दरांमधील कपातीबद्दल सविस्तर माहिती दिली. पिंपरी येथील हॉटेल घरोंदा, मोरवाडी येथे आज पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेला भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्यासह आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, विकास डोळस, प्रदेश सदस्य राजेश पिल्ले, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, माजी उपमहापौर तुषार हिंगे, जीएसटी रिफॉर्म अभियान संयोजक मधुकर बच्चे, सहसंयोजक बबनराव डांगले, आत्मनिर्भर भारत संकल्प अभियानाचे संयोजक राजू दुर्गे, व्यापारी आघाडीचे राजेंद्र चिंचवडे, कैलास कुटे आदी पदाधिकारी उपस्थित होते. जीएसटी रिफॉर्म अभियान संयोजक मधुकर बच्चे, सहसंयोजक बबनराव डांगले, आत्मनिर्भर भारत संकल्प अभियानाचे संयोजक राजू दुर्गे यांनी अभियानाविषयी माहिती दिली व सेवा पंधरवडा अभियानाच्या संयोजिका वैशाली खाडये यांनी झालेल्या कार्यक्रमांची माहिती दिली. यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा पंधरवडा' अभियान राबवले जात आहे. पिंपरी-चिंचवड शहरात या अभियानांतर्गत विविध सेवाभावी उपक्रम घेण्यात आले. यामध्ये ५० हून अधिक आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिरे तसेच स्वच्छता अभियानांचा समावेश होता.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046